
નિમિત્ત વાઢદિવસાંચે

સ્મરણ વૃક્ષસંવર્ધનાચે !!





।। राष्ट्र प्रहरी ।।



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने लोकसभा अध्यक्ष ओम बिडला, रक्षा मंत्री राजनाथ सिंह और गृह मंत्री अमित शाह के साथा शुक्रवार को लोकसभा सचिवालय द्वारा आयोजित पौधरोपण अभियान मे भाग लिया ।

राष्ट्रिय हरित राजमार्ग मिशन के तहत २००० किमी वृक्षारोपण के काम प्रदान किये ।
हरित राजमार्ग बनाने के लिए हरियाणा और आंध्रप्रदेश राज्यों के साथ सहमति पत्र पर हस्ताक्षर किए गए। जल्द ही और राज्यों के साथ समझौते किये जायेंगे ।
राष्ट्रिय हरित राजमार्ग मिशन वृक्षारोपण कार्य में स्वयं सहायता समूह, पंचायतों गौर गैर सरकारी संगठनों की भागीदारी के कारण रोजगार सृजन से सीधे स्थानीय लोगों को लाभ पहुचाएगा ।





विकास और समावेशी विकास के साथा-साथ पर्यावरण संतुलन के लिए प्रतिबध्द है ।

चार शब्द...

आपल्या सगळ्यांचे लाडके नेतृत्त्व, विद्यार्थी परिषदेपासून तर भारतीय जनता पक्ष पर्यंतच्या कार्यकर्त्यांचा भलामोठा गोतावळा गेल्या चार दशकांच्या सामाजिक कर्तबगारीच्या कार्यकाळात संकलित केलेले डॉ. रामदासजी भ. आंबटकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्यावर शुभेच्छांचा कृतीशील वर्षाव करणाऱ्या तमाम मित्रवर्यांच्या भावना आणि कृतीचे प्रतिनिधित्व करणारी ही चित्रपुस्तिका आहे.

डॉ. रामदासजी आंबटकर यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून या मित्रपरिवाराने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रमांमधून डॉ.रामदासजी आंबटकरांवरील प्रेमाचे जाहीर प्रकटन केले. त्याला सामाजिक दायित्वाच्या जाणिवेची जोड दिली. डॉ.रामदासजी आंबटकरांच्या एका सामान्य कार्यकर्त्यांपासून तर आमदारकी पर्यंतच्या प्रवासात त्यांचे साथीदार आणि साक्षीदार राहिलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी हा क्षण साजरा करणे हा सोहळा होता. पण त्यालाही सामाजिक जबाबदारीची किनार लाभल्याने हा सोहळा अधिक देखणा झाला. किमान २०० ठिकाणी वृक्षारोपण झाले व ११००० वृक्षांची लागवड झाली. सध्याच्या कोरोनाग्रस्त परिस्थितीचे भान जपत कितीतरी ठिकाणी सॅनिटायझर आणि मास्क वाटप झाले. काही ठिकाणी रुग्णांना फळवाटप करण्यात आले. अक्षरशा हजारो कार्यकर्त्यांच्या, मित्रांच्या, चाहत्यांच्या उपस्थितीत, त्यांच्या सहभागातून हा उपक्रम यशस्वी झाला. या विविध उपक्रमांच्या आठवणी कायम सोबतीला ठेवता याव्यात म्हणून त्यांचा संग्रह या स्मरणिकेच्या रुपात तयार केला आहे. अधिकांश उपक्रम यात समाविष्ट करण्यात आले आहेत. भौतिक सुखांच्या कल्पनेत वावरणाऱ्या आजच्या या जगात देखील आपले कार्यकर्ते सामाजिक जाणिव जपून आहेत, निसर्गसंवर्धानाचा ध्यास त्यांच्या मनात कायम आहे, याचा प्रत्यय घालून देणारे हे उपक्रम या पुस्तिकेच्या माध्यमातून अधिक काळपर्यंत प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास वाटतो. म्हणून आपल्या सर्वांच्या सहभागातून साकारलेली ही पुस्तिका आपल्या स्वाधीन करताना अत्यानंद होतो आहे. आपले मन:पूर्वक आभार मानत ही पुस्तिका आपल्या स्वाधीन करीत आहे.

आयोजन समिती
रविंद्र चव्हाण
सुनिल राजे
गिरिश गोखले

नितीन गडकरी
NITIN GADKARI



सत्यमेव जयते

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग;
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways;
Micro, Small and Medium Enterprises
Government of India

जा.क. 133 /कीआयपी/परि/सूलम/२०२०
दिनांक : 28/07/2020

शुभेच्छा संदेश

''निमित्य वाढदिवसाचे– स्मरण वृक्षसंवर्धनाचे' या पुस्तिकेला माझ्या हार्दिक शुभेच्छा ! आ.डॉ.रामदास आंबटकर यांच्या वाढदिवसाचे निमित्य साधून विदर्भातील सर्व जिल्हयात ११ हजारपेक्षा जास्त वृक्षारोपण करून एक अभिनंदनीय आणि स्तुत्य उपक्रम आपण राबवीत आहात. तसेच कोरोना विषाणुच्या काळात मास्क,सॅनिटायझर वितरित करून आणि कोरोनापासून बचावाबद्दल जनजागृती करून आणि सामाजिक जाणिवेचे भाव ठेवले. रक्तदान शिबिर आयोजित करून रक्ताची आवश्यकता असणाऱ्या रूग्णांसाठी आपण एक महनीय काम केले आहे. सध्या रक्त आणि प्लाझमाची आवश्यकता अधिक आहे. वृक्षारोपणाचे काम एक सामाजिक जबाबदारीचे काम असून या सर्व उपक्रमाबद्दल आयोजन समिती अभिनंदनास पात्र आहात. आपल्या पुस्तिकेला माझ्या पुन्हा हार्दिक शुभेच्छा !

भवदीय

(नितीन गडकरी)

श्री.सुनिल दामोधर राजे
मु.पो.पिंजर, ता.बार्शी टाकळी,
जि.अकोला

Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: (RTH) 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F),
Room No. 168, Udyog Bhawan, Rafi Marg, New Delhi – 110 011, Tel.: (MSME) 011-23061566, 23061739 (O), 23063141 (F),
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in / https://msme.gov.in



देवेंद्र फडणवीस

विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा

दि.:- ०८ ऑगस्ट, २०२०

प्रति,

श्री.रामदास आंबटकरजी,

सस्नेह नमस्कार,

आपल्याला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!

वाढदिवस हा केवळ जीवन कालखंडवृद्धीचा एक स्मरण मात्र दिवस नाही, तर तो सिंहावलोकनाचा सुद्धा दिवस असतो. सरलेल्या कालखंडाचे चिंतन तर आगामी काळासाठीचा तो संकल्पदिवस सुद्धा असतो. सामाजिक जीवनात कार्यरत व्यक्ती तर अनेकविध आयोजनांतून या दिवसाचा सुद्धा समाजासाठी वापर करून आपले सामाजिक ऋण फेडण्याचा प्रयत्न करीत असतात.

मला आनंद आहे की, आपल्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी सुमारे ११ हजारहून अधिक वृक्षारोपण केले. निसर्ग संवर्धनासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी हा उपक्रम अतिशय उपयुक्त असाच आहे. कोरोनाच्या काळात मास्क, सॅनेटायझर, गरजूंना धान्यवितरण असे उपक्रम आयोजित करून भारतीय जनता पार्टीच्या सेवाकार्याचाच वसा याही निमित्ताने पुढे चालविला, ही सुद्धा अतिशय आनंदाची बाब आहे. हे सारे उपक्रम पुस्तकबद्ध करण्याचा उपक्रम सुद्धा स्तुत्य आहे. पर्यावरण संवर्धन, सेवाभाव या भाजपाच्या परंपरेला साजेसे उपक्रम राबविणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे सुद्धा मी अभिनंदन करतो.

आपल्याला आणि संपूर्ण टीमला पुनश्च एकदा शुभेच्छा!

आपला,

(देवेंद्र फडणवीस)

कार्यालय : १३३, पहिला मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२
टेलीफोन : ०२२-२२०२ ३५५३, **फॅक्स :** ०२२-२२०२ ८८१६



सुधीर स. मुनगंटीवार
विधानसभा सदस्य
माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

दिनांक : २३.७.२०२०

-: शुभेच्छा संदेश :-

विधान परिषद सदस्य मा. आ. डॉ. रामदासजी आंबटकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन १ जुलै २०२० रोजी विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये अकरा हजारावर वृक्षारोपण करून त्या माध्यमातुन पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचा निर्धार आपण केला याकरिता आपले मन:पूर्वक अभिनंदन ! वाढदिवस साजरा करताना त्याला सेवाकार्याची जोड देत मास्क, सॅनिटायझर्स व गरजूना धान्याच्या किट्स वितरीत करून एक नवा आयाम आपण प्रस्थापित केला आहे.

या सेवाकार्याला रक्तदानासाररख्या श्रेष्ठ दानाची जोड देत रक्तदान शिबीरांचेही आयोजन आपण केले ही बाब सुध्दा निश्चीतच अभिनंदनीय व प्रशंसनीय आहे. या कार्याचे सचित्र पुस्तक आपण प्रसिध्द करीत आहात ही सुध्दा महत्वपूर्ण बाब आहे. या माध्यमातुन सेवाकार्याचा मौलीक दस्तावेज तयार होईल. आ. डॉ. रामदासजी आंबटकर यांच्यासाररख्या सेवाव्रती, सेवाधर्मी नेत्याला आपण अभिनव पध्दतीने दिलेल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा खरोखरच अनुकरणीय आहेत. श्री. सुनिल राजे, श्री. रविंद्र चव्हाण, श्री. गिरीष गोखले व आयोजन समितीच्या सर्व सदस्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

मा. डॉ. रामदासजी आंबटकर यांना पुन:श्च हार्दिक शुभेच्छा !

सस्नेह शुभेच्छांसह.....

स्नेहांकित

(सुधीर मुनगंटीवार)

गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी : (कार्या.) ०७१७२-२५२५८२,
फॅक्स : ०७१७२ - २५८८००, ७७२२०७४१९९, अजय धवने स्वीय सहा. ९८२२५६५९२६,
Email : sudhirmungantiwar@yahoo.co.in, ajayd852@gmail.com, bjpchandrapur@gmail.com 9552799608

चंद्रकांत (दादा) पाटील

अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

सदस्य, महाराष्ट्र विधान सभा



शुभ संदेश

दि. 6 ऑगस्ट 2020

सस्नेह नमस्कार,

विधान परिषदेतील सदस्य **डॉ.रामदास आंबटकर** यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून "**निमित्त वाढदिवसाचे- स्मरण वृक्षसंवर्धनाचे**" ही पुस्तिका प्रकाशित करत आहात ही अत्यंत स्तुत्य बाब आहे.

या निमित्ताने विदर्भातील जवळपास 200 ठिकाणी 11000 पेक्षा जास्त वृक्षारोपण करुन वृक्षसंवर्धनाची चळवळ उभी करतांनाच त्या माध्यमातून कार्यकर्त्यांची एक श्रृंखला तयार केलीत. कोरोनाच्या जागतिक महामारीत मास्क, सॅनिटायजर्स बरोबरच गरजुंना धान्याचे किट्स वाटप करणे, तसेच रक्तदान शिबीराचे आयोजन करणे यासारखे समाजाभिमूख उपक्रम राबविलेत. आपण केलेले हे कार्य कार्यकर्त्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे

आपण प्रकाशित करत असलेल्या "**निमित्त वाढदिवसाचे- स्मरण वृक्षसंवर्धनाचे**" या पुस्तिकेस व पुढील वाटचालीस माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा.

आपला,

C.B.Patil

(आ.चंद्रकांतदादा पाटील)

प्रदेश अध्यक्ष

कार्यालय : सी.डी.ओ. बॅरेक नं.१, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०. दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०/२२०४८६८७

cbpatil.bjpmaha@gmail.com

https://twitter.com/ChDadaPatil https://www.facebook.com/ChDadaPatil/

https://instagram.com/chdadapatil http://www.youtube.com/c/ChDadaPatil

शुभेच्छा संदेश



प्रिय श्री. आम.डॉ.रामदास आंबटकर

सस्नेह नमस्कार,

१ जुलै २०२० रोजी वयाची साठ वर्षे पूर्ण केल्याबद्दल मनापासून अभिनंदन व शुभेच्छा.

आपल्याकडे साठ वर्षे म्हणजे निम्मी वाटचाल केल्याचे मानले जाते. म्हणजे अजून खूप काही करण्यासाठी भरपूर वेळ आहे. त्यासाठी परमेश्वराने आपल्याला आरोग्यसंपन्न दीर्घ आयुष्य द्यावे ही त्याचे चरणी विनम्र प्रार्थना ।

मला असे कळले आहे की या निमित्ताने तुमच्या जवळच्या सुहृदांनी जवळपास ११ ते १२ हजार वृक्षाचे रोपण केले आहे. ही बाब फारच अभिनंदनीय व अनुकरणीय आहे. ह्या सर्वांना धन्यवाद । त्यांचे कौतुक आहे. एक विचार मनात आला. तो म्हणजे एवढ्या मोठ्या संस्थेने लावलेल्या वृक्षांचे संवर्धन नीट व्हावे आणि असे करण्यासाठी सर्व मित्र परिवाराने ठराविक वृक्षरोपांचे पालकत्व द्यावे. ''दसवी लकडी एकका बोझा'' अर्थात कदाचित तशी योजना झाली ही असेल सुचले म्हणुन लिहीत आहे.

''लोकांना योग्य दिशेने नेणारा तो नेता'' अशी व्याख्या तुम्ही सार्थ करालच. या उपक्रमांचे अनेकांनी अनुकरण केले तर ते मोठे राष्ट्रकार्यच नव्हे तर जागतिक कार्य होवू शकले. पर्यावरणाचा समतोल साधण्याच्या दिशेने ते उचलेले पाऊल ठरेल.

अशा लोक कल्याणकारी कामासाठी नवेनवे प्रकल्प तुम्ही सर्व मिळून राबवाल याची खात्री वाटते.

घरातील सर्वांना यथाधिकार नमस्कार व आशीर्वाद.

सर्व परिचितांना व बंधुभगिनींना सस्नेह नमस्कार ।

पुन्हा एकवार अभिनंदन व शुभेच्छा.

''जीवेत शरदः शतम्।। ''

शुभाकांक्षी



१२ जुलै २०२०

प्रा.बाळ वि.दीक्षित
पुणे

विकासाचे एक रोप..

अलीकडे अनेक प्रकारचे दिवस साजरे करण्याची पद्धत निर्माण झाली आहे. नुकताच मैत्री दिवस साजरा करण्यात आला. आपापल्या मित्रांना, मित्रांच्या विविध समुहात शुभेच्छा संदेश झळकले. मातृ दिवस, पितृ दिवस साजरे करून शुभेच्छा देण्याची पद्धत अलीकडे रूढ झालेली दिसते.

आपली भारतीय संस्कृती मात्र एखाद्या दिवसापुरतं प्रेम, आत्मियता व्यक्त करायला शिकवत नाही. तर रक्ताच्या नात्यातील कुटुंब असो अथवा आपुलकीच्या नात्यातील बृहत् परिवार, परस्पर विश्वासावर आधारलेल्या या संबंधांची वीण इतकी घट्ट आहे की तिच्यापुढे थँक्यू सारखे शब्द अतिशय तोकडे वाटतात.

'शुद्ध सात्विक प्रेम अपने कार्य का आधार है' हे गीत गुणगुणत विद्यार्थी परिषदेचे काम आपण करत आलो. पुढे संघ प्रेरणेने कार्य करणाऱ्या अनेकविध संस्था, संघटनामध्येही काम करायला लागलो. या सर्व कामात सुरुवातीपासून ज्यांच्याशी आपलं मैत्र जुळलं त्यांना कधीही विसरता आले नाही. अभाविपच्या कामात दत्ताजी डिडोळकर यांनी घालून दिलेला वारसा मा. बाळासाहेब दीक्षितांसोबत नि त्यांच्या मार्गदर्शनात काम करताना पुढे चालवता चालवता असंख्य कार्यकर्ते 'सांगाती आले'. भारतीय जनता पार्टीच्या कामातही असेच देवदुर्लभ मित्र मिळाले.

नव्या-जुन्या मित्रांच्या या परिवारातून 'तू माझा सांगाती' या नावाचा एक कार्यक्रम नागपूर या आपल्या पुण्यभूमित साजरा झाला. पुढे अशाच प्रकारचा कार्यक्रम कळंब येथेही झाला. त्या निमित्ताने नव्या-जुन्या कार्यकर्त्यांचे पारिवारिक मीलन झाले. दरवर्षी कुठेतरी एकत्र जमलो पाहिजे. सुखदुःखाच्या गप्पाटप्पा करतानाच सामाजिकतेचे भान राखणारे उपक्रम होऊ शकतात का, याचीही चर्चा घडली पाहिजे. त्यातून प्रकल्प उभे होतील या हेतूने एक जुलै या माझ्या वाढदिवसाचे निमित्त करत गेलो.

यावर्षी एक जुलैला कोरोना महामारी काळ असल्याने माझा वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करायचा ठरवला खरा, परंतु आपल्या परस्पर संपर्कातून, कल्पकतेतून तो विदर्भभर वृक्षारोपण आणि संवर्धन दिवस म्हणून साजरा झाला. प्रत्येक जिल्ह्यात, विविध तालुक्यात, अगदी खेडोपाडी सुद्धा भारतीय वृक्षांचे रोपण आणि त्याच्या संवर्धनाची नीट काळजी घेणारे उपक्रम सर्वांनी राबविले. वाढदिवसाच्या निमित्त असला तरी वृक्षसंवर्धनाचा हा संकल्प आपण निश्चितच पूर्णत्वास नेणार आहोत. खरे तर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्ष नेता मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या सरकारातील अर्थ, वने मंत्री मा.सुधिरभाऊ मुनगंटीवार यांनी सुरु केलेली ही वृक्षारोपण संवर्धनाची चळवळ प्रेरणादायी ठरली.

त्यानंतर, आपले सर्वांचे आधारवड मा. नितीनजी गडकरी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळेच ज्या मंत्रालयाचे सोनं होऊ घातलंय अशा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग योजनेचे संचालक श्री.पी.एफ. पालेवार यांची मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नितीनजीच्या प्रेरणेने घेण्यात आलेल्या या वेबिनॉरने स्वयंरोजगार निर्मितीच्या दृष्टीने अनेक प्रकल्प कसे सुरु होऊ शकतात, आहेत त्याला भरभराटीला नेण्यासाठी कोणते प्रयोग केले जाऊ शकतात याविषयी अप्रतिम मार्गदर्शन झाले. हा उपक्रम पुढे सुरू राहून माननीय पंतप्रधानांनी आवाहन केल्याप्रमाणे 'आत्मनिर्भर भारत' हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी केलेला हा अनेक प्रयत्नांपैकी एक प्रयत्न आहे. आणि मला विश्वास आहे या प्रयत्नात असंख्य तरुण पुढे येतील.

पुनश्च सर्वांना धन्यवाद!

डॉ. रामदास आंबटकर



डॉ. रामदासजी भ.आंबटकर आमदार विधानपरिषद यांनी वृक्षारोपण करून अभियानाची सुरवात पांडे लेआऊट, खामला येथे केली. सोबत रविंद्र चव्हाण व अनुराग ठाकरे

उदय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भांडेवाडी नागपूर उपस्थिती उपमहापौर सौ.मनिषाताई कोठे, टचमी फाऊंडेशनचे राजेश गोलर, रविंद्र चव्हाण, संस्थेचे सचिव प्राचार्य विनोद मेंढे, संचालिका सौ.सिमा मेंढे, महायुथ संघटनेचे मोहम्मद वहीदअली, मुख्याध्यापक श्री. रामदास माळवे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.





मा.हंसराज भैय्या अहिर यांच्या हस्ते टेंभुर्डा त.वरोरा, जि.चंद्रपूर, बाबासाहेब भागाडे जि.उपाध्यक्ष, राजु गायकवाड बांधकाम सभापती जि.प.चंद्रपूर, ओम मांडवकर ता.महामंत्री, सौ.ज्योतीताई वाकडे जि.प.सदस्य, नगराध्यक्ष, अहतेश्याम अली नगर भाजपा अध्यक्ष सुरेश महाजन श्री.जगदिश तोरटावार व कार्यकर्ते उपस्थित होते.



वृक्षारोपण अमरावती शहर अध्यक्ष
मा.किरणभाऊ पातुरकर, श्री.भारत चिखलकर,
सौ.संध्याताई टिकले माजी महापौर,
श्री.सचिन रासने, श्री.राजु हजारे,
श्री.गजाननराव देशमुख

अमरावतीचे महापौर श्री.चेतन गावंडे व
अमरावती जिल्हा अध्यक्ष
मा.किरणभाऊ पातुरकर यांच्या
नेतृत्वात शहराच्या विविध ठिकाणी वृक्षारोपण झाले.
सोबत विनयजी नगरकर, दिपक पोहेकर





माहुर गढावर सौ.कृतिकाताई सराफ – वरणगांवकर आणि
मैत्रिणी मिळुन वृक्षारोपण संपन्न झाले.



प्रा.अतुलभाऊ देशकर
माजी आमदार ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर



अमरावती मनपा महापौर श्री.चेतन गावंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. किरणजी पातुरकर उपमहापौर, कुसुमताई शाहु, अजय सारसकर, प्रविन सोनी, सचिन रासमे, भारत चिखलकर, सौ.सुरेखाताई लुंगारे, सौ.रिता मोकलकर, सौ.लताताई देशमुख, सौ.लविना हर्षे, सौ.स्वाती कुळकर्णी, सौ.सुनंदा खरड, सौ.सुचिता बीरे, आशिष अनवरे



पोंभुर्णा जि. चंद्रपूर येथे वृक्षारोपण करतांना चिंतामणी महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी



श्री. जयंत डेहनकर माजी जिल्हा अध्यक्ष अमरावती यांच्या नेतृत्वात.





प्रा.हेमंत देशमुख भाजपा जिल्हा महामंत्री, भंडारा शहर अध्यक्ष संजय कुंभलकर, अमोल तलवारे, तिलक वैद्य, ॲड.होमेश्वर रोकडे, प्रविण उदापूर, नितिन कारेमोरे, पिताम्बर उरकुडे यांच्या नेतृत्वात भंडारा जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण झाले.























कुरखेडा:१जुलै

भारतीय जनता पार्टी– कुरखेडा च्या वतीने प्रदेश महामंत्री तथा विधान परिषेदेचे आमदार डॉ. रामदासजी आंबटकर व गडचिरोली–चिमूर क्षेत्रा चे लोकप्रिय खासदार व भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा चे राष्ट्रीय उपाध्यक्ष *मा श्री अशोक नेते यांचा वाढदिवस कुरखेडा नगर पंचायत येथे वृक्षारोपण व नगर पंचायत कुरखेडा शहराला साफ, सुंदर ठेवणारे सफाई कर्मचारी यांना शाल देऊन कोविड–१९ च्या काळात अगदी साद्या पद्धतीने साजरा करण्यात आला

या कार्यक्रमाला उपस्थित भाजपा तालुका अध्यक्ष नाजूकजी पुराम, चांगदेव भाऊ फाये सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ ,रवींद्रजी गोटेफोडे नगराध्यक्ष न प कुरखेडा विलासभाऊ गावंडे,रामभाऊ लांजेवार रामहरीजी उगले नगरसेवक कु.शाहिदा ताई मुगल नगसेविका, अर्चनाताई वालदे नगरसेविका, बंडुभाऊ लांजेवार युसुफ पठाण, रोशन सयद इत्यादी मान्यवर उपस्थित होते



भा.ज.यु.मो. तर्फे रूग्णांना फळे व मास्कचे वितरण आज दिनांक १ जुलै रोजी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, विधान परिषदेच सदस्य आमदार डॉ. रामदासजी आंबटकर, भारतीय जनता युवा मोर्चा चे जिल्हा सरचिटणीस तथा आरमोरी नगर परिषदेचे स्वच्छता व आरोग्य सभापती भारत बावनथडे, भा.ज.यु.मो. जिल्हा उपाध्यक्ष सुधीर सपाटे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा आरमोरी तर्फे स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना फळे, बिस्कीट व मास्कचे वितरण करण्यात आले. तसेच डॉक्टर्स डे निमित्य उपस्थित सर्व डॉक्टरांचे



गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. याप्रसंगी भारतीय जनता युवा मोर्चा चे जिल्हा सरचिटणीस तथा आरमोरी नगर परिषदेचे स्वच्छता व आरोग्य सभापती भारत बावनथडे, भारतीय जनता युवा मोर्चा चे जिल्हा सचिव सुनील नंदनवार भारतीय जनता युवा मोर्चा चे जिल्हा उपाध्यक्ष सुधीर सपाटे, गोपाल भांडेकर, डॉ.गजभिये, डॉ. चिखराम, टिंकू बोडे, अनिल नन्नावरे, उपजिल्हा रुग्णालयातील नर्सेस व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते



वृक्षारोपण करून व साफ सफाई कर्मचारी यांना शाल श्रीफळ देऊनवाढदिवस साजरा* कुरखेडा:१जुलै
भारतीय जनता पार्टी– कुरखेडा च्या वतीने प्रदेश महामंत्री तथा विधान परिषेदेचे आमदार डॉ. रामदासजी आंबटकर यांचा वाढदिवस कुरखेडा नगर पंचायत येथे वृक्षारोपण व नगर पंचायत कुरखेडा शहराला साफ, सुंदर ठेवणारे सफाई कर्मचारी यांना शाल देऊन कोविड–१९ च्या काळात अगदी साद्या पद्धतीने साजरा करण्यात आला
या कार्यक्रमाला उपस्थित भाजपा तालुका अध्यक्ष



नाजूकजी पुराम, चांगदेव भाऊ फाये सिनेट सदस्य गोंडवाना विद्यापीठ ,रवींद्रजी गोटेफोडे नगराध्यक्ष न प कुरखेडा विलासभाऊ गावंडे ,रामभाऊ लांजेवार रामहरीजी उगले नगरसेवक कु.शाहिदा ताई मुगल नगसेविका, अर्चनाताई वालदे नगरसेविका, बंडुभाऊ लांजेवार युसुफ पठाण, रोशन सयद इत्यादी मान्यवर उपस्थित होते



पुलगाव - श्री.संजय गाते, महादेवराव कनसे, मंगेश झाडे, श्री.बेले



हिंगणघाट - सौ.छाया सातपुते, सौ.अनिता साळवे, सौ.वैशाली पहांडे, श्री.सुभाष कुरेवार यांच्या सोबत श्री.तुळसकर





श्री.नितिन सुकळकर, श्याम खत्री व सौ.खत्री









श्री.रविंद्र चव्हाण, श्री.किरणराव देशपांडे, श्री.प्रशांत पुष्पपवार, श्री.अनुराग ठाकरे





माजी स्थायी समिती सभापती श्री. तुषार भारतीय व श्री.किरणभाऊ पातुरकर सोबत कार्यकर्ते अमरावती



कारंजा (वाशीम) प्रा.ज्ञानेश्वर काळे, सौ.मिनाताई काळे,
सोमनाथे सर, अजय कावड, श्री.चौधरी, मंगल नानवटे,
सौ.स्वाती गुल्हाने, श्री.नरेंद्र गुल्हाने, अभय काळे,
प्रणव वाळे, श्री.घाटगे, श्री.निमगांवकर, श्री.देवेंद्र नानवटे




यवतमाळ
माजी जिल्हाध्यक्ष–राजेंद्र डांगे, श्री.अमोल ढोले,
श्री.उध्दवराव येरणे, श्री.राजु पडगीलवार, श्री.दिलिपजी



कारंजा, जि.वाशीम, जिल्हाध्यक्ष आम.
श्री.राजेंद्रजी पाटणी, अमीत मानवर, श्री.राजु राजे पाटील, प्रा.ज्ञानेश्वर काळे आणि कार्यकर्ते

डॉ. रामदास आंबटकर : एका कार्यकर्त्याच्या कर्तृत्वाचा प्रवास...

सुमारे चार दशकांपूर्वीचा काळ असेल. ऐंशीच्या दशकाला नुकतीच सुरुवात झालेली. यवतमाळात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीच्या एका वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, वेगवेगळ्या सामाजिक, राष्ट्रीय मुद्यांचा उहापोह. वातावरण कसे भारावलेले होते. त्यात समारोपाला दस्तुरखुद्द दत्ताजी डिडोळकरांची उपस्थिती. त्यांच्या अभ्यासपूर्ण भावनात्मक विवेचनानंतर, आधीच भारावलेल्या आपसूकच वातावरणाला समर्पणाची झालर लाभली. बीएएमएसच्या अभ्यासक्रमाला असलेले रामदास आंबटकर हे त्या क्षणाचे साक्षीदार होते. नाही म्हणायला घरातले वातावरण संघसंस्कारांचा वारसा सांगणारे होतेच. पण, विद्यार्थी–क्षेत्रातलं कामही तितकंच आव्हानात्मक अन् गरजेचं असत्याची खात्री पटली अन् स्वतःला त्यासाठी झोकून देण्याचा निर्धार झाला. तो क्षणही एका वज्रनिर्धाराचा साक्षीदार ठरला. डॉ. रामदास आंबटकर यांच्या गेल्या चार दशकांच्या सामाजिक, राजकीय प्रवासाचा पाया तिथेच रचला गेला होता. वर्धा जिल्ह्यातल्या हिंगणघाट तालुक्यातलं वडनेर हे एक छोटंसं गाव. चाळीस वर्षांपूर्वी तर अगदीच दीड–दोन हजार लोकवस्तीचं ठिकाण. नागपूर–हैद्राबाद हायवेवर असूनही अडगळीत राहिल्यागत अवस्था असलेल्या या गावातील आंबटकर कुटुंब मात्र संघकार्यामुळे पंचक्रोशीत प्रसिद्ध पावलेलं. गावात लागणाऱ्या शाखेचा ध्वज असो, की मग प्रवासात आलेल्या प्रचारक, अधिकाऱ्यांसाठीचा निवास. सर्वांसाठी हक्काचं ठिकाण म्हणजे भगवानजी आंबटकरांचं घर. सदस्यसंख्येचा विचार करता मोठं म्हणावं असं ते घर. पण, बाहेरून आलेल्या पाहुण्यासाठी जागा मात्र कधीच कमी पडली नाही तिथे. उशिरापाशिरा पोहोचलं तरी स्वागत, आस्थेनं होणारी विचारपूस, पिठलं–भाकरीची व्यवस्था अन पाठ टेकायला अंथरुणाची सोय हमखास असायची– कार्यकर्त्यांपासून तर अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी... रामभाऊ बोंडाळे, यशवंतराव बाजारे, श्रीषजी देवपुजारी यांच्यासारखे प्रचारक घरी आले की, त्यांच्याशी होणाऱ्या वार्तालापातून विचारांची बैठक अधिकच मजबूत व्हायची.



संस्कारांचा हाच वारसा गाठीशी जपत रामदास आंबटकर वडनेरच्या संघशाखेतून थेट विद्यार्थी परिषदेच्या दालनात दाखल झाले. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाले असल्याने एव्हाना डॉक्टरकीचं बिरूद नावामागे लागलं होतं. आव्हानं स्वीकारण्याचा, पेलून धरण्याचा आणि त्याच्याशी दोन हात करण्याचा स्वभाव मुळातच असल्याने त्यासाठी वेगळ्याने प्रयत्न करण्याची गरज नव्हती. सोबतीला एक गोष्ट आणखी होती, ती म्हणजे माणसं जोडण्याची हातोटी. मानवी मनाला हळुवार साद घालण्याची तऱ्हा आजवरची जडणघडणच मुळात माणूस घडविण्याच्या प्रयोगशाळेतून झालेली. त्यामुळे अभाविप नावाचे संघटन, आंदोलनाची उभारणी लीलया साकारत गेली. सुरुवातीला यवतमाळ, अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थी संघटन बांधणीची जबाबदारी आली. महाविद्यालयातून बाहेर पडलेला एक विद्यार्थी–नेता पुन्हा महाविद्यालयाच्या प्रांगणात आपल्या

संघटन कौशल्याची चुणूक दाखवू लागला. १९८५ म्हणजे राष्ट्रीय युवा वर्ष. त्या वर्षी डॉ. रामदास आंबटकर यांच्याकडे अभाविपच्या प्रदेश मंत्रिपदाची जबाबदारी आली. त्यानिमित्ताने दोन जिल्ह्यांचा परीघ ओलांडून संपूर्ण विदर्भात प्रवास करायचा होता. शहरं, गावं पादाक्रांत करायची होती. व्यक्तिनिर्माणाचे हे अभियान सर्वव्यापी करायचे होते. सैदा रेड्डी यांनी त्यांच्या अनोख्या कार्यशैलीतून सकारात्मक पार्श्वभूमि तयार केलेली होतीच. त्यावर बीजारोपण करण्याचे कौशल्य सिद्ध करण्याच्या संधीचे सोने करीत डॉ. रामदास आंबटकरांनी विद्यार्थी परिषदेच्या विदर्भ प्रदेश संघटनमंत्र्यांची जबाबदारीही तितक्याच कर्तबगारीने सिद्ध केली.

जबाबदाऱ्यांचे निर्वहन करायचे, संधीचे सोने करायचे, मिळेल त्या अनुभवातून शिकत जायचे, गुण-अवगुणांसह माणसं स्वीकारायची, जोडत न्यायची, कार्यकर्त्यांचा गोतावळा निर्माण करायचा... ध्यास एकच- संघटन बांधणीचा... राष्ट्रनिर्माणाचा...

अभाविप हे मुळातच व्यक्तिनिर्माणाच्या ध्येयानं काम करणारं संघटन. डॉ. रामदास आंबटकर यांनी त्यांच्या कार्यपद्धतीतून त्या उद्देशाला बळकटी दिली. बहुधा त्याचाच हा परिणाम राहिला की, त्यांच्या संघटन मंत्रिपदाच्या कार्यकाळात सुखवस्तू घरांपासून तर विपरीत परिस्थितीत, आर्थिक विवंचनेत जगणाऱ्यांपर्यंत सर्वच स्तरातील कार्यकर्ते या प्रवाहात सहभागी झाले. त्यातील कित्येकांनी उच्चशिक्षणानंतर संघटनेसाठी पूर्णवेळ वाहून घेण्याचा दृढनिश्चय केला. प्रवास मेळघाटातला असो की मग गडचिरोलीतला, ग्रामीण जीवनाची अनुभूती घेत गावं पिंजून काढण्याचा एकच ध्यास असायचा. वनवासी जीवनाचा अनुभव शहरी विद्यार्थ्यांना यावा म्हणून चलशिबिरांच्या आयोजनासाठीचा त्यांचा खास आग्रह असायचा. या देशाच्या ग्रामीण, दुर्गम भागात राहणाऱ्या जनतेच्या वाट्याला स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही न्याय आलेला नसल्याची वस्तुस्थिती शहरी युवकांच्या ध्यानात आणून देण्यासाठीची ती धडपड असायची. गावखेड्यातील श्रमशिबिरांचे उपक्रमही त्याच उद्देशांवर बेतलेले असायचे. ग्रामविकासाच्या कल्पनेचा बोध व्हायला माणसं चांगली हवीत. जाणती हवीत, तरंच गावं समृद्ध होतील. गावकेंद्रित विकास झाला तरच देश समृद्ध होईल, ही भावना तरुणाईत रुजायला त्या उपक्रमाची मदत होई. बेताची आर्थिक स्थिती, साधन-संसाधनांची मर्यादा, मोठे अंतर एसटीनं पार करत गावात सायकलनं फिरण्याचे ते दिवस. पण, मनातली उमेदच इतकी तगडी होती की, या साऱ्या बाबी म्हणजे अडचणी आहेत, असं कधी वाटलंच नाही. दत्ताजी डिडोळकर, प्राचार्य बाळासाहेब दीक्षित, अरुण भांडारकर ही वरिष्ठ मंडळी मायेनं सांभाळायची. सणासुदीला हक्कानं बोलावणं असायचं बाळासाहेबांच्या घरी. सदाशिवराव देवधरांची वडिलकीची भूमिका दर भेटीत नवी उमेद जागवायची. सुनील आंबेकर, श्रीकांत भारतीय, प्रवीण टेंभेकर यांच्यासारखे सहकारी हिरीरीने काम करण्याची प्रेरणा द्यायचे. सदाशिवराव देवधर, मदनदासजी देवी यांच्यासारखी व्यक्तिमत्त्व, आदर्शवत असं त्यांचं जीवन, त्याला त्यांच्या त्यागातून मिळालेली झळाळी, या गोष्टी तर जणू समाजकार्यासाठी आयुष्य ओवाळून टाकण्याची ऊर्मी देऊन जायच्या. स्व. यशवंतराव केळकरांनी विकसित केलेल्या 'माणूस घडविण्याच्या' तंत्राचा कित्ता तेवढा गिरवायचा होता. तो गिरवत गिरवत, विद्यार्थी परिषदेच्या कार्याचा पसारा वाढत होता. राष्ट्रहिताची, तरुणाईच्या गरजांची, विद्यार्थ्यांच्या मागण्यांची वेगवेगळी आंदोलनं या काळात झाली. दरम्यान, अभाविपचे काम थांबवून वैयक्तिक आयुष्य सुरू करण्याचा निर्णय झाला. डिसेंबर १९९२ मध्ये अकोल्यात आयोजित प्रांत बैठकीत त्याबाबत रीतसर घोषणा झाली. आता एका नव्या वळणावरच्या प्रवासाला सुरुवात होणार होती.

एकीकडे व्यक्तिगत आयुष्याची सुरुवात, तरुण भारतातली नोकरी, संघाच्या एका भागासाठी संपर्क प्रमुखाची जबाबदारी, स्वदेशी जागरण मंचाच्या एका मोठ्या यात्रेचे प्रमुख म्हणून त्याच्या नियोजनाची जबाबदारी, असं

करता करता नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्यपद चालून आले. त्याच्या निवडणुका लढणं, जिंकणं यासोबतच विद्यापीठातील राजकारणाचा जरासाही परिणाम होऊ न देता फक्त शिक्षणाचा दर्जा, शैक्षणिक व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या गरजा, मागण्या याभोवतीच आपली कारकीर्द केंद्रित राहावी यासाठी डॉक्टरांनी आवर्जून प्रयत्न केले. त्याचे सकारात्मक परिणाम विद्यापीठ वर्तुळाने अनुभवले. एव्हाना डॉ. रामदास आणि सौ. गीता यांच्या संसारवेलीवर अजिंक्य आणि वैदेही ही दोन फुलं उमलली. संघाची पार्श्वभूमी नसलेल्या घरातून आल्या असतानाही गीता वहिनींनी संसार 'इकडच्या' पद्धतीनं छान सांभाळला, याबद्दलची भावना व्यक्त करताना डॉक्टरांच्या भावनांचा कल्लोळ गहिवराच्या पलीकडला असतो...

दरम्यान, या प्रवासातले एक नवीन पर्व सुरू झाले. २००४ मध्ये बाळासाहेब आपटे यांच्याशी झालेल्या भेटीनंतर राजकीय क्षेत्रातला प्रवेश निश्चित झाला. यापुढे भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बांधणीसाठी समर्पित कार्य करावं, असा प्रस्ताव आला. त्याचा स्वीकार झाला. संघटन, आंदोलन, मोर्चे, पक्षबांधणी, कार्यकर्ता, काम दुर्गम भागापर्यंत पोहोचविण्याची धडपड, नेतृत्व... या साऱ्या विषयांना हात घालण्याची संधी पुन्हा एकदा समोर होती. कौशल्य होतेच. ते पणाला लावले गेले. ही जबाबदारी वाट्याला येत नाही तोच लोकसभेच्या निवडणुकी पुढ्यात होत्या. पूर्ण ताकदीने मैदानात उतरायचे होते. अकोला–अमरावतीच्या, पक्षाच्या दृष्टीने काहीशा खडतर भागातच कस लागणार होता. तो लागला. यशही हाती लागले. लोकसभा निवडणुकीत पक्षाला विजय मिळाला. तत्कालीन प्रदेशाध्यक्ष नितीन गडकरी यांनी विश्वास व्यक्त करीत पश्चिम विदर्भाच्या संघटन बांधणीची जबाबदारी सोपवली. बी.टी. देशमुखांसारख्या मातब्बर नेत्याला पराभूत करणाऱ्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे मायक्रो प्लानिंग राजकारणाची गणितं बदलवून गेली. सुमारे तीस वर्षांपासून पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत अन् राजकारणात एकतर्फी, निर्विवाद अधिराज्य गाजविणाऱ्या बीटींचा पराभव होऊ शकतो, हे अमान्य करणाऱ्या तमाम जनांना आश्चर्याचा धक्का दिला होता, तो राजकारणा–पलीकडच्या, ग्राऊंड लेव्हलच्या, कार्यकर्त्यांच्या सूक्ष्म नियोजनाने. मेहनतीने. परवा परवा पदरात पडलेल्या आमदारकीचा अपवाद वगळला, तर गेली चार दशकं ते सामान्य कार्यकर्त्यांच्याच भूमिकेत जगले– 'असू अम्ही सुखाने, पत्थर पायातील...' म्हणत. भविष्यातही याच तत्त्वांनिशी, जमिनीत पाय रोवून उभे राहण्याचा ठाम निर्धार तर त्याहून महत्त्वाचा...

सुनील कुहीकर
९८८१७१७८३३



हनुमान टेकडी येथे आक्सीजन पार्कमध्ये डॉ.रामदासजी आंबटकर यांच्या हस्ते श्री. मुरलीधर बेलखोडे, महेश गुजरकर, श्रीधर देशमुख आणि अनेक सेवाभावी कार्यकर्ते



ऑक्सीजन पार्क येथे ड्रीप वाटर सिस्टीमसाठी 5 लक्ष रुपये. आमदार निधीतून दिले फलकाचे अनावरण करताना डॉ. रामदासजी आंबटकर.



हनुमान टेकडी येथे स्वयंसेवकांशी चर्चा वर्धा



वृक्षारोपण करताना कार्यकर्ते वर्धा



वर्धा.वेकअप वेलफेयर सोसायटीतर्फे वृक्षारोपण.



डॉ. विजय पर्वत आंजनसरा देवस्थान परिसर जि. वर्धा यांच्या नेतृत्वात श्री.धनराज मेश्राम, नामदेवराव गाढवे, राजेंद्र ढवळे, श्री.रमेश ठाकरे उपसरपंच, नरेंद्र पाटील सरपंच श्रावण काचोळे



कार्यकर्ते वृक्षारोपण करतानांचा क्षण.

श्री.कमलाकर निंबोरकर,अशोक विजयवर, अनिल ठोंबरे, आवेद खान, दिपक डाखोले, अजय लेकुरवाळे, सुरेश काळबांडे



श्री. योगेशराव खोडे यांच्या नेतृत्वात इंदिरा गांधी विद्यालय अलीपूर, वर्धा



कमलाकर निंबोरकर यांच्या नेतृत्वात आष्टी, जि.वर्धा





ता.आष्टी येथे कमळाकर निंबोरकर, अशोकराव अहिरकर, ॲड.मनिष ठोंबरे, अवेज खान, दिपक डाखोळे, अजय लेकुरवाडे, प्रज्वल चोहूरकर, सुरेशराव काळबांडे, नरेंद्र भावेरकर, अविनाश कदम, बिट्टु अग्रवाल, अन्य गावकरी उपस्थित होते.



कार्यकर्ते व ग्रामस्थ बोरी, ता.सेलु



कार्यकर्ते वृक्षारोपण करताना देवळी, जि.वर्धा



कार्यकर्ते व ग्रामस्थ,अजय कुलासपुरकर यांच्या नेतृत्वात हिंगणी, ता.सेलु



कार्यकर्ते वृक्षारोपण करतांना ता.सेलु, जि.वर्धा



बादल पोहडे यांच्या नेतृत्वात जुनोना, जि.वर्धा
हिंगणी येथे अजय कुलासपुरकर यांच्या पुढाकाराने व वन विभागाच्या सहकार्याने हिंगणी गावातील मोठ्या प्रमाणावर तरुण मंडळीनी टेकडीवर 1500 वृक्षांची लागवड, वृक्षारोपण केले.



प्रविण सावरकर व किशोर गव्हाळकर यांच्या नेतृत्वात
नाचनगाव प्रा.आरोग्य केंद्र,जि.वर्धा



प्रविण सावरकर जि.प.सदस्य व माजी प.स.सभापती
किशोर गव्हाळकर यांच्या नेतृत्वात नाचनगाव,जि.वर्धा



वृक्षारोपण करतांना कार्यकर्ते



वृक्षारोपण करतांना महिला कार्यकर्ते



सोढी, ता.सेलु–मास्क व सॅनिटाईझर वितरण.



तळेगाव (शा.प.) ता.आष्टी 1930 जंगलसत्याग्रह येथे
वृक्षारोपण सौ. अंकिता होळे जि.प. सदस्य



जि.प. सदस्य सौ.अंकीता सचिन होळे यांच्या नेतृत्वात.



वर्धा जिल्हा संपर्क कार्यालयात केक कापतांना डॉ. रामदासजी आंबटकर



वर्धा जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्याला केक भरवतांना

1930चा जंगल सत्याग्रहाच्या स्थानावर श्री.गुलाबराव नरंगे, दत्ताभाऊ कुसबेकर, नवाब पठाण, राहुल भुले, त्रिशुल भुयार, दिनेश कोंडुलकर, मुस्ताक पठाण, अंकुश नरंगे, इतिहासाची आठवण म्हणून या घाटात वृक्षारोपण व संगोपनाचा संकल्पकरीत जि.प. सदस्य सौ.अंकिता सचिन होले यांच्या नेतृत्वात हा कार्यक्रम संपन्न झाला.





हिंगणघाट, सौ.छायाताई सातपुते.



हिंगणघाट– नितीन सुकळकर, श्याम खत्री, दत्ता भांगे.





कारंजा घाडगे येथे मास्क वितरण श्री.शिरिष भांगे यांचे नेतृत्वात.



वडनेर येथे श्री दुर्गा मंदिर येथे पुजन.



डॉ. रामदासजी आंबटकर वडनेर गावात वृक्षारोपन



वडनेर येथे ग्रामस्थाकडून आशिर्वाद व शुभेच्छा स्विकारताना







वडनेर येथे गरजुंना धान्य किट वितरण करताना. 200 धान्य किट वितरीत करण्यात आला.
वडनेर येथे झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. वसंतराव आंबटकर, माजी शिक्षण सभापती, तालुका अध्यक्ष आकाश पोहाणे, सरचिटणीस तुषार आंबटकर, पं.स. सभापती सौ. शारदा आंबटकर, बंडूभाऊ आंबटकर व ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.



इंदिरा गांधी महाविद्यालय अलीपूर येथे वृक्षारोपण करतांना डॉ. रामदासजी भ. आंबटकर व संस्थेचे सचिव श्री.योगेशराव खोडे व शिक्षक वृंद.





वर्धा शहरामध्ये युथ पिस फाऊंडेशनच्या वतीने नागरीकांना 1000 फळांचे वृक्ष वाटप करण्यात आले. श्री.अतुल तराळे नगराध्यक्ष वर्धा, सौ.श्रेया श्रीधर देशमुख, संस्थेचे अध्यक्ष श्री.सारंग रघटाटे यांच्या नेतृत्वात हा उपक्रम राबविण्यात आला.

वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन...

पदाधिकाऱ्यांच्या नजरेतून : डॉ.रामदासजी आंबटकर

करे अल्पज्ञानी बहू बडबडाट, जला निर्झराचा अति खळखळाट, असे पूर्णज्ञानी कमी बोलणारा बिना नाद वाहे जशी गंगाधारा. अर्थात समाजात अनेक प्रकारचे लोक असतात. काही लोक केवळ बडबड करण्यात पटाईत असतात तर काही बोलण्यापेक्षा कृती करण्याला महत्व देतात. निर्झरा सारखा खळखळाट करण्यापेक्षा गंगाधरे सारखे संथ वाहत अवघा मतदार संघ आपल्या विकास कामांनी व्यापून टाकरा एक दमदार आमदार म्हणून मी डॉ. रामदासजी आंबटकर यांना ओळखते. महाराष्ट्राची भूमी मोठी सुदैवी आहे. कारण इथे वाडवडिलांच्या सेवेचा वारसा मोठ्या अभिमानाने सांगितल्या जातो. अशाच सेवेचा वारसा ज्यांना लाभला असे भाजपा महाराष्ट्र प्रदेश महामंत्री आमचे नेते व आमदार माननीय डॉ. रामदासजी आंबटकर. रामदासजींना घरातच संघ आणि भाजपा विचारांचे बाळकडू मिळाले. वडील भगवानराव आंबटकर म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील एक मोठे सत्याग्रही नेते. बाणेदार वृत्ती, त्यागमय भावना, निस्वार्थ कार्य करण्याची प्रवृत्ती व संघाप्रति निष्ठा या गुणांनी परिपूर्ण असलेल्या भगवानरावांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन संघ कार्याला वाहून घेतले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य करत असताना त्यांनी वर्धा शहरात सर्वप्रथम संघ शाखा सुरू करण्याचा बहुमान मिळविला. सोबतच आचार्य विनोबा भावेंच्या भूदान चळवळीत स्वतःला झोकून दिले. सामाजिक समरसतेचा आदर्श घालून देणाऱ्या भगवानरावांचा पुत्र म्हणून रामदासजींचा उल्लेख गौरवाने करता येइल. रामदासजींचा जन्म एक जुलै १९६० साली वर्धा जिल्ह्यातील वडनेर या गावी झाला. घरी पित्याचा वैचारिक वारसा, संस्कार व शिस्त होतीच. लहानपणापासूनच रामदासजींनी बहिण भावंडांसह संघ शाखेची वाट धरली. स्वयंसेवक म्हणून वावरतांना संघ शिस्तीचे धडे गिरवत गेले आणि नकळतच संघ संस्काराच्या मुशीत रामदासजी विद्यार्थी देशपासूनच तयार होत गेले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ते भाजपा महाराष्ट्राचे महामंत्री व पुढे आमदार हा त्यांचा प्रवास अतिशय खडतर व संघर्षमय आहे. संघ व पक्षाचे काम करीत असताना भाजपाचे विदर्भ संघटन मंत्री, उपाध्यक्ष, अकोला भाजपा व अमरावती जिल्ह्याचे संघटनमंत्री, पश्चिम विदर्भाचे संघटन मंत्री, भाजपा महाराष्ट्राचे महामंत्री व आता आमदार अशी विविध पदे त्यांनी अतिशय कुशलतेने व संयमाने सांभाळीत या सर्व पदांना न्याय दिलेला आहे. ही पदे सांभाळत असताना त्यांचा विविध नेत्यांशी, भाजपा पदाधिकाऱ्यांशी संपर्क आला. त्यातल्या त्यात त्यांच्यावर अमरावती शहरातील भाजपा पदाधिकाऱ्यांचा विशेष स्नेह असल्यामुळे त्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त आपल्या भावना, आपला स्वानुभव व्यक्त केला. त्यांच्याच शब्दात मांडण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न. भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष मा.श्रीमान किरणभाऊ पातुरकर यांच्या शब्दात, रामदासजी म्हणजे संघटन कौशल्याचे मूर्तिमंत प्रतीक. संघटनकार्य करीत असतांना सतत प्रवास, कार्यकर्त्यांशी प्रचंड संपर्क याचं अजब–गजब ताकतवर रसायन म्हणजे रामदासजी आंबटकर होय. संघटन कार्य करीत असताना रामदासजी कधी एका गावात खूप दिवस राहिले असतील असं चित्र दुर्लभ. प्रवासाचा उद्देश फक्त एकच संघटन आणि संघटन. त्यांच्यासारखे कार्यकर्ते भारतीय जनता पार्टी जवळ आहे म्हणून आज भाजपा मजबूत आहे. व्यक्ती व्यक्तीवर प्रेम न करता संघटनेवर प्रेम कसं करावं ते रामदासजी कडून शिकण्यासारखं आहे. त्यामुळेच भाजपा सारखा पक्ष राष्ट्रीय स्तरावर पोहोचला. भाजपा मध्ये असताना भाजपाचा जो सिद्धांत आहे, तोच त्यांचा सिद्धांत होता. प्रथम देश, नंतर पक्ष आणि शेवटी व्यक्ती आणि हाच सिद्धांत त्यांनी आजपर्यंत टिकवून ठेवला आहे. माझे भाग्य आहे की, मला रामदासजींच्या वडिलांसोबत वर्धा भाजपाचे अध्यक्ष असताना काम करण्याची संधी मिळाली. रामदासजींना त्यांच्या आयुष्यामध्ये, राजकारणामध्ये सुयश चिंतितो व त्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. भारतीय

